
# समिती दर्पण

डिसेंबर २०२५

विद्यार्थी साहाय्यक समिती : दूरध्वनी : ०२०-२५५३३६३१, मोबाईल : ९४०४८५५५३०
ईमेल : info@samiti.org, वेबसाईट : www.samiti.org


## गावाच्या अभ्यासातून उद्योजकतेकडे

### विद्यार्थ्यांच्या अनुभवातून उलगडलेली एक शिकण्याची यात्रा


**डॉ. ज्योती गोगटे, हेमंत राजहंस, हेमा बापट**

**उद्योजकता विकास कक्ष, विद्यार्थी साहाय्यक समिती**


विद्यार्थी साहाय्यक समितीच्या विद्यार्थ्यांना दिवाळीच्या सुटीत एक असाइनमेंट दिली होती, 'तुमच्या मूळ गावाचे सविस्तर सर्वेक्षण करा.' ही असाइनमेंट केवळ शैक्षणिक औपचारिकता नव्हती, तर विद्यार्थ्यांना स्वतःच्या गावाकडे नव्या नजरेने पाहायला लावणारी, प्रश्न विचारायला शिकवणारी आणि उद्योजकीय विचारांची पहिली ठिणगी पेटविणारी उद्योजकीय दृष्टी विकसित करण्याची एक जाणीवपूर्वक आखलेली प्रक्रिया होती.

#### १. कुटुंब आणि गाव : शिकण्याची पहिली शाळा

विद्यार्थ्यांना त्यांचे स्वतःचे कुटुंबीय आणि गावकऱ्यांच्या मदतीने निरीक्षण करून सर्वेक्षण करण्याच्या स्पष्ट सूचना देण्यात आल्या होत्या. अनेक विद्यार्थ्यांनी पहिल्यांदाच आई-वडील, आजी-आजोबा, शेतकरी, दुकानदार, महिला बचत गट सदस्य आणि स्थानिक उद्योजक यांच्याशी सखोल संवाद साधला. या संवादातून केवळ माहिती नव्हे, तर अनुभवसंपन्न ज्ञान आणि वास्तवाचे भान मिळाले. अनेक विद्यार्थ्यांसाठी हा अनुभव नवा होता.

#### विद्यार्थ्यांच्या प्रतिक्रिया-

**आजोबांनी सांगितलेले शेतीतील बदल पुस्तकात कधीच मिळाले नसते."**

**महिलांना घराजवळ काम मिळालं तर त्यांचा आत्मविश्वास वाढतो, हे मला कळलं."**

#### २. फील्ड रिसर्चचा खरा अर्थ-

या सर्वेक्षणाचा उद्देश विद्यार्थ्यांना समस्या ओळखता येणे, लोकांशी संवाद साधणे आणि त्या आधारे उद्योजकीय उपाय सुचविणे, हा होता. पाणीटंचाई, रोजगार, शेतीमाल प्रक्रिया, महिलांसाठी संधी आणि बाजारपेठ यांवर विद्यार्थ्यांनी सखोल निरीक्षण नोंदविले.

#### विद्यार्थ्यांचे निरीक्षण-

**प्रक्रिया उद्योग नसल्यामुळे भाजीपाला वाया जातो, इथेच अन्नप्रक्रियेची संधी आहे."**

#### ३. विचारातून पुराव्याकडे

या असाइनमेंटमुळे 'मला वाटते'ऐवजी 'मी पाहिले, मी ऐकले, माहिती सांगते' असा दृष्टिकोन तयार झाला. डेटा, अनुभव आणि निरीक्षण यांच्या आधारे विचार करण्याची सवय लागली आणि अनेक विद्यार्थ्यांना स्वतःच्या उद्योजकीय प्रवासाची पहिली ठोस दिशा मिळाली.



#### एका विद्यार्थ्याने स्पष्टपणे लिहिले-

**आता मी मत नव्हे, तर पुराव्यावर आधारित विचार करतो."**

हीच उद्योजकीय विचारांची खरी सुरुवात आहे.

#### ४. सादरीकरण, आत्मपरीक्षण

विद्यार्थ्यांनी गावाबद्दलच्या सर्वेक्षणावर आधारित सादरीकरण केले. व्यासपीठावर उभे राहून बोलताना त्यांचा आत्मविश्वास दिसून आला.

**पहिल्यांदाच वाटलं की माझ्या गावाबद्दलचं ज्ञान मौल्यवान आहे आणि त्यातून काहीतरी नवीन करता येऊ शकतं."**

#### ५. सर्वेक्षणातून समोर आलेली निरीक्षणे-

**भौगोलिक विविधता : महाराष्ट्राचे वास्तव**

सर्वाधिक विद्यार्थी पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाडा भागातील असून, त्यानंतर उत्तर महाराष्ट्र, विदर्भ आणि इतर भागांचा क्रम लागतो.

**प्रत्येक भाग वेगळा असला तरी रोजगार आणि बाजारपेठेची अडचण सगळीकडे सारखीच आहे."**

#### ६. गावांचा आकार, लोकसंख्या आणि संधी-

बहुतेक गावे २ हजार ते १० हजार लोकसंख्येची आहेत.

**लघुउद्योग, पूरक व्यवसाय व स्थानिक बाजारपेठांवर आधारित उपक्रमांसाठी मोठी संधी आहे.'**

#### ७. कुटुंबीय व्यवसाय आणि उपजीविका-

**सर्वेक्षणानुसार,**

- वडिलांचा मुख्य व्यवसाय शेती / शेतीपूरक आहे.
- मातांचा सहभाग घरकामासोबत शेती, बचत गट किंवा लघुउद्योगात आहे.
- जमीनधारणा प्रामुख्याने अर्धा एकर ते तीन एकर इतकी आहे.

#### विद्यार्थ्यांना उमगले की,

**मर्यादित साधनांमध्येही मूल्यवर्धन करून उत्पन्न वाढविता येते.**

#### ८. शेतीतील अडचणी-

विद्यार्थ्यांच्या उत्तरांतून जाणवलेल्या मुख्य अडचणी- मजुरांची कमतरता, पाणी व वीजपुरवठ्याची अनिश्चितता, बाजारभावावर नियंत्रण नसणे, साठवणूक सुविधा नाहीत.

**शेती ही उत्पादनासोबत व्यवस्थापनाचीही समस्या आहे.'**

#### ९. विक्री आणि बाजारपेठ-

बहुतेक ठिकाणी शेतमालाची विक्री स्थानिक बाजार, आठवडे बाजार किंवा आडत्यांमार्फत होते. थेट शहरी बाजारपेठा किंवा डिजिटल विक्रीशी जोड मर्यादित आहे.

#### यामुळे विद्यार्थ्यांनी ओळखले की,

**पुरवठा साखळी सुधारणा, थेट विक्री आणि डिजिटल प्लॅटफॉर्मद्वारे मोठ्या संधी निर्माण होऊ शकतात.'**

#### १०. उद्योजकीय संधी

**सर्वेक्षणातून पुढील क्षेत्रांत संधी दिसून आल्या :**

- अन्नप्रक्रिया उद्योग (डाळी, मसाले, भाजी प्रक्रिया)
- दुग्धव्यवसाय व मूल्यवर्धित उत्पादने
- सौर ऊर्जा व बायोगॅस
- सेवा आधारित व डिजिटल उद्योग
- महिला बचत गट आधारित उपक्रम

**महत्त्वाचे म्हणजे या कल्पना प्रत्यक्ष गावातील वास्तवातून जन्मलेल्या होत्या.**

**उद्योग म्हणजे फक्त मोठी फॅक्टरी नाही; गावातल्या छोट्या समस्येवरचा उपायही उद्योग असू शकतो."**

#### निष्कर्ष

विद्यार्थ्यांनी गावाचे निरीक्षण करीत फक्त त्याचे वर्णन नाही, तर समस्यांवर उपाय, संधी आणि नवकल्पना यांचा सखोल विचार केला. युवक स्थलांतर व डिजिटल तयारीच्या आव्हानांवर लक्ष दिले आणि योग्य मार्गदर्शन व प्रशिक्षण मिळाल्यास गावातच उद्योग सुरू करण्याची तयारी दिसून आली. हा अनुभव विद्यार्थ्यांना नोकरी शोधणाऱ्यांऐवजी संधी निर्माण करणाऱ्या उद्योजकांकडे नेणारा ठरला.

## नव्या साजात रंगली जुन्या मराठी गीतांची मैफल

### 'शतजन्म शोधताना' कार्यक्रमाला देणगीदार, हितचिंतकांची उत्स्फूर्त दाद




*'शतजन्म शोधताना' या कार्यक्रमातील कलाकारांसह समितीचे पदाधिकारी आणि विश्वस्त.*

'गेला मोहन कुणीकडे', 'कुठून अचानक आला कान्हा'पासून 'सांगा मुकुंद कुणी हा पाहिला'पर्यंत, 'आई मला नेसव शालू नवा'पासून 'फड सांभाळ तुऱ्याला गं आला'पर्यंत, 'विठ्ठल तो आला आला'पासून 'इंद्रायणी काठी'पर्यंत... अनेक अवीट गोडीची भावगीते, लावण्या, भक्तिगीतांनी रसिकांना मराठी साहित्य आणि चित्रपटसृष्टीच्या सुवर्ण काळाची सफर घडवून आणली.

निमित्त होते विद्यार्थी साहाय्यक समितीने देणगीदार आणि हितचिंतकांसाठी २९ डिसेंबर रोजी आयोजित केलेल्या 'शतजन्म शोधताना' या सांगितिक कार्यक्रमाचे. समितीच्या कार्यात देणगीदार, हितचिंतकांचे मोलाचे योगदान आहे. त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी दरवर्षी सांगितिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. या वर्षी खास या कार्यक्रमासाठी अमेरिकेतून देणगीदार आवर्जून आले होते.

'शतजन्म शोधताना' या कार्यक्रमाची संकल्पना संगीत संयोजक, दिग्दर्शक देवेंद्र भोमे यांची होती. कार्यक्रमाचे निवेदन प्रसिद्ध अभिनेत्री, कवयित्री स्पृहा जोशी यांनी केले. गेल्या ऐशी ते नव्वद वर्षांपासून मराठी रसिकांच्या मनात घर केलेली गीते सध्याच्या तरुण पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी त्यावर नवा साज चढवून सादर करण्यात आली. त्याचबरोबर देवेंद्र आणि स्पृहा


पान २ वर ▶


विद्यार्थी घडविण्याचे कार्य विद्यार्थी साहाय्यक समिती या संस्थेत समर्पित भावनेने केले जाते, हे लक्षात आल्याने या कार्याला आपणही हातभार लावावा, असे वाटले. मी माझ्या सर्व गुंतवणूकदारांना आवाहन करतो की, त्यांनी समितीच्या कार्याला पाठबळ द्यावे.

- **भूषण वाणी, संचालक,**
**क्रिसेंट म्युच्युअल फंड डिस्ट्रिब्युटर्स कंपनी प्रा. लि.**

समितीत ग्रामीण भागातून येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या निवास-भोजनाच्या व्यवस्थेबरोबरच त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न केला जातो. बदलत्या काळानुसार उद्योजकता आणि कौशल्य विकास यावर सध्या भर दिला जात आहे. शेतीसाठी एआय तंत्रज्ञानाचा वापर कसा करायचा, याचा प्रत्यक्ष अनुभव देण्याचा प्रयोग करणार आहोत. देणगीदार, हितचिंतकांनी या कार्यासाठी सहकार्य करावे.

- **प्रतापराव पवार,** अध्यक्ष, विद्यार्थी साहाय्यक समिती

तयाचा वेलू...

# समितीची तत्पर कार्यकर्ती

कोणत्याही अडचणीला, अडथळ्याला न घाबरता आणि समोर जी संधी येईल, तिचा फायदाच करून घेणारी समितीची माजी विद्यार्थिनी मनीषा गोसावी. मनीषाताईंचे मूळ गाव जुन्नर तालुक्यातील ओतूरजवळचे डिंगूर. वडील शिक्षक होते. बारावीनंतर त्या डी.एड. करण्याच्या उद्देशाने पुण्यात आल्या. पण त्यांना ॲडमिशन मिळाली नाही. काहीही करून पुण्यात राहायचे, या विचाराने त्यांनी हॉटेल मॅनेजमेंट कोर्सला ॲडमिशन घेतली. वडील शिक्षक असल्याने त्यांना समितीत ॲडमिशन मिळत नव्हती. पण वडिलांनी गावात अनेक मुलांच्या शिक्षणासाठी खर्च आणि प्रयत्न केले आहेत, हे कळल्यावर तो निकष बाजूला ठेवून समितीने प्रवेश दिला.

समितीत त्या दीडच वर्ष राहू शकल्या. त्यानंतर त्या इंडस्ट्रिअल ट्रेनिंगसाठी सहा महिने औरंगाबादला गेल्या. त्यामुळे त्यावेळी समितीतील कोणाशी त्यांना मैत्री करता आली नाही, उपक्रमात भाग घेता आला नाही, याचं त्यांना खूप दुःख आहे.

कोर्स संपल्यावर कॅम्पस प्लेसमेंटमधून त्यांना खंडाळ्यात नोकरी मिळाली. मात्र लग्नानंतर पुण्यात यावे लागल्याने नोकरीवर पाणी सोडावे लागले. त्या संसारात रमल्या, पण काहीतरी करण्याची उर्मी त्यांना स्वस्थ बसू देईना. घर सांभाळून शक्य होईल म्हणून घरच्यांनी त्यांना ब्युटी पार्लरचा कोर्स आणि काम करायची परवानगी दिली. जेमतेम दीड महिन्याच्या प्रशिक्षणाच्या जोरावर त्यांनी स्वतःचे पार्लर सुरू केले. अनेक अडचणींतून त्या मार्ग काढत त्यांनी व्यवसाय सुरू ठेवला. कधीकधी दिवसाला जेमतेम पाच- दहा रुपये मिळायचे. मात्र स्वतःवरचा विश्वास, मी जे करीन ते चांगलेच करीन ही बुद्धी, करिअरसाठी कष्ट करण्याची तयारी हे सगळे गुण मनीषाताईंना हळूहळू यशाकडे घेऊन गेले.

दरम्यान, त्यांच्या पतीच्या भागीदारीतील व्यवसायात काही अडचणी आल्या. मनीषाताई त्यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभ्या राहिल्या. पतीचा व्यवसाय स्वतंत्रपणे चांगला चालू झाला. त्यांच्या कष्टामुळे, सगळे घर सांभाळून घेण्याच्या, सगळ्यांना मदत करण्याच्या वृत्तीमुळे सासुसासऱ्यांनाही त्यांच्या कर्तृत्वाचे कौतुक वाटू लागले.

२०१४ मध्ये त्या परत समितीकडे वळल्या. एका जर्मन ऑर्गनायझेशनतर्फे त्यांना समितीमधल्या मुलींसाठी मदत मिळवून देता आली. त्यातून त्यांना मदत करण्याचा हा नवा रस्ता दिसला. तांबोळी सरांमुळे त्या अतिशय प्रेरित झाल्या. समितीसाठी काम करणे, हा आनंदाचा एक नवीन स्रोत त्यांना सापडला.



मनीषा गोसावी

"किती कमावलं तर पुरे, हे ठरवणं अवघड आहे आणि सोपंही. माझ्या गरजा भागत असतील तर आता एवढं पुरे आहे. मग मला माझ्या इतर आवडीनिवडी, कला, स्वतःकडे लक्ष देता येईल, असा विचार करून किती काम घ्यायचं, हे ठरवायला लागले. त्वचेवर काम करायला मला आवडतं, तेही शक्य तितक्या नैसर्गिक उपायांनी. ते मी करते. इतर कामासाठी मुली आहेत."

कोरोना काळात समितीमधील काम त्यांनी वाढवले. सहाय्य संकलन, माजी विद्यार्थी संघटना, स्नेहमेळाव्यांचे आयोजन अशा उपक्रमांत त्यांनी स्वतःला झोकून दिले. माजी विद्यार्थिनींना परत समितीकडे आणण्यासाठी त्या विशेष प्रयत्न करतात. "मुली जबाबदाऱ्यामध्ये अडकतात, पण त्यांना मी थोडे तरी काम करण्यासाठी प्रवृत्त करते," असे त्या म्हणाल्या. प्रत्यक्ष पैशाने मदत करता आली नाही तरी आपण सहाय्यकर्त्यांपर्यंत समितीची माहिती पोचवू शकतो, समितीमुळे आपल्या आयुष्याला कसा आकार मिळाला, हे सांगू शकतो. समितीला कार्यकर्ते खूप मिळतील पण माजी विद्यार्थी कुठल्याही कामात मदत करू शकतात, कारण त्यांना समिती आतून- बाहेरून पूर्णपणे माहीत आहे. हे इतर माजी विद्यार्थ्यांना त्या पटवून देतात.

समितीशिवाय त्यांच्या परिवाराचा आणखी एक ट्रस्ट आहे. तिथेही त्या कार्यरत आहेत. महिला सक्षमीकरण हा त्यांच्या जिव्हाळ्याचा विषय आहे. मुलींना शिकवून उभे करणे, पार्लर चालवण्यासाठी मदत करणे, हे तर त्या करतातच. अडचणींमुळे अगदी आत्महत्येपर्यंत पोचलेल्या मुलींनासुद्धा त्यांनी परत यशस्वीपणे उभे केले आहे.

त्या म्हणतात, "परिवाराला सहभागी करून घेतल्याशिवाय कोणतेही काम समाधानाने करता येत नाही. जेव्हा परिवाराला गरज होती, तेव्हा मी माझे शंभर टक्के तिथे दिले. आता ते माझ्या कामात सहकार्य करतात."

त्यांना एक मुलगा आणि एक मुलगी आहे. मुलगा इंजिनीअर झाला आहे, पण त्याला फूड इंडस्ट्रीमध्ये रस आहे. स्वतःचे एक हॉटेल यशस्वीपणे चालवून आता त्याने दुसरे युनिटही सुरू केले आहे. त्यांची मुलगी बीबीएच्या पहिल्या वर्षात शिकते आहे.

**(शब्दांकन- माधवी कुलकर्णी)**

## महोत्सवातून मुलांनी घेतली ग्रंथालयांसाठी आवडीची पुस्तके

पुण्यात १४ ते २१ डिसेंबर दरम्यान भरलेल्या पुणे पुस्तक महोत्सवातून समितीच्या ग्रंथालयांसाठी अवांतर पुस्तकांची खरेदी मुलांनीच करायची, अशी संकल्पना ग्रंथालय उपसमितीचे अध्यक्ष वल्लभ कोल्हटकर यांनी मांडली. त्यासाठी दहा हजार रुपयांची तरतूद करण्यात आली. सर्व वसतिगृहांच्या ग्रंथालय प्रमुखांनी प्रदर्शनाच्या ठिकाणी जाऊन आपल्या आवडीनुसार, दिलेल्या बजेटमध्ये पुस्तक खरेदी केली. त्यांच्याबरोबर समितीच्या कार्यकर्त्या सुप्रिया केळवकर व कविता हेब्बाळकर या उपक्रमात सहभागी झाल्या होत्या.





## नगरमधील संस्था, व्यक्तींची समितीला सहकार्याची ग्वाही

अहिल्यानगरमध्ये समितीचे कार्य अधिक सक्षमतेने होण्यासाठी १० डिसेंबर रोजी कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर, माजी विश्वस्त प्रदीप मांडके, मुख्य विकास अधिकारी चंद्रकांत कुलकर्णी यांनी विविध संस्था, व्यक्तींची भेटी घेतली.

या दौऱ्यात प्रथम आमीच्या (एमआयडीसीमधील कंपन्याची संस्था) कार्यालयाला भेट दिली. आमीचे अध्यक्ष जयद्रथ खाकाळ, राजीव गुजर, राजेंद्र शुक्रे, रोहित सर, दिलीप अकोलकर, संजय बंदिष्टी, राजेंद्र कटारिया,राजीव गोपाळ भाई, राजेंद्र कांडेकर यांच्याबरोबर झालेल्या बैठकीत समितीची माहिती आणि उपक्रम सांगितले. डॉ. महेश मुळे यांच्या हॉस्पिटलला भेट दिली. त्यांनी दोन मुलांचे पालकत्व घेत असल्याचे सांगितले.

'स्नेहालय'चे डॉ. गिरीश कुलकर्णी यांच्याशी संवाद साधला. दरम्यान, रेडिओ नगर ९०.४ वर तुषार रंजनकर यांची मुलाखत झाली. उद्योजक संजय गुगळे, कापड व्यापारी जय मुनोत सारडा, डॉ. सुधा कांकरिया यांची भेट घेतली. सर्वांनी समितीचे काम समजून घेतले. यथाशक्ती मदत करण्याचे आश्वासन दिले. समितीच्या मुलींच्या व मुलांच्या वसतिगृहात जाऊन कामाची पाहणी केली व मुलामुलींशी संवाद साधला. नगरमधील कार्यकर्ते रवींद्र देशपांडे, शिवाजी बोलभट, नंदकुमार देशपांडे, सुनीता झिंजाड व पर्यवेक्षक कुंदन पठारे दौऱ्यात सहभागी झाले होते.

## कैवल्यधाम योग इन्स्टिट्यूटला समितीच्या पदाधिकाऱ्यांची भेट

समितीच्या पदाधिकाऱ्यांनी ३ डिसेंबर रोजी लोणावळा येथील कैवल्यधाम योग इन्स्टिट्यूटला भेट दिली. या दौऱ्यात कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर, कायम विश्वस्त तुकाराम गायकवाड, कार्यकर्त्या सुप्रिया केळवकर, मुख्य विकास अधिकारी चंद्रकांत कुलकर्णी सहभागी झाले होते. शंभर वर्षांची परंपरा असलेल्या या संस्थेचे कार्य अंजली देशमुख आणि अक्षता प्रधान यांनी समजून सांगितले. कैवल्यधामच्या सहयोगाने विद्यार्थ्यांसाठी योगासन प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू करण्याचा समितीचा मानस आहे.



## दिनदर्शिकेचे प्रकाशन

दरवर्षीप्रमाणे समितीची नववर्ष २०२६ ची दिनदर्शिका प्रकाशित झाली आहे. ग्लेझ पेपरवर काढलेल्या या रंगीत दिनदर्शिकेच्या चार हजार प्रती प्रसिद्ध केल्या आहेत. दिनदर्शिकेचा सर्व खर्च माजी विद्यार्थी आणि अन्य हितचिंतकांनी दिलेल्या जाहिरातींमधून उभा राहिला आहे.




समिती वृत्त

## सांस्कृतिक स्पर्धांमध्ये ६५० विद्यार्थ्यांचा सहभाग

### अंतिम फेरीसाठी ५२ विजेत्यांची निवड

विद्यार्थी विकास केंद्राच्या वतीने ९ ते १८ डिसेंबर या कालावधीत समितीच्या सर्व वसतिगृहांमध्ये सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. समितीच्या इतिहासात पहिल्यांदाच एकाच वेळी सर्व वसतिगृहांमध्ये सांस्कृतिक स्पर्धा झाल्या. त्यातून ६५० स्पर्धकांना आपले कौशल्य सादर करण्यासाठी व्यासपीठ मिळाले.

या स्पर्धांमधून ५२ विजेत्या स्पर्धकांची निवड झाली असून हे सर्व विद्यार्थी-विद्यार्थिनी आता उन्मेष युवा महोत्सवामध्ये अंतिम फेरीत सहभागी होणार आहेत. या स्पर्धांसाठी ४८ परीक्षकांना आमंत्रित करण्यात आले होते, त्यापैकी ३७ परीक्षक प्रथमच समितीच्या कार्यक्रमात सहभागी झाले. या स्पर्धांच्या यशस्वी आयोजनासाठी विद्यार्थी विकास केंद्र समन्वयक प्रणय पाले, सर्व वसतिगृहांचे विद्यार्थी विकास केंद्र प्रमुख रोहित घोडे, प्रतीक मांकर, गीतांजली चोळे, पर्णवी म्हस्के, जीवन बोधले, सुमेधा नांदनवरे, दिशा पाखले, तसेच सर्व सहाय्यक आणि पर्यवेक्षक यांनी परिश्रम घेतले.

## महेश्वरी गिरडे हिची युवा संमेलनासाठी निवड



समितीची विद्यार्थिनी महेश्वरी गिरडे हिने आंतरराष्ट्रीय युवा संमेलनात महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले. ओडिशातील भुवनेश्वर येथे १४ ते १६ डिसेंबर दरम्यान झालेल्या या संमेलनात देशभरातील युवा प्रतिनिधी सहभागी झाले होते. महाराष्ट्रातून चौघांची निवड झाली होती. त्यात वर्ध्याच्या महेश्वरीचा समावेश होता. संमेलनात भारतीय संस्कृती, परंपरा, युवा नेतृत्व, उद्योजकता, जागतिक शांतता, पर्यटन विकास आदी विषयांवर सत्रे झाली.

## मयूर लहामगेचा जपानमध्ये झेंडा



समितीचा विद्यार्थी मयूर लहामगे याची नुकतीच जपानमधील डीएलटीएक्स या कंपनीमध्ये निवड झाली आहे. मयूर याने जपानमध्ये चार कंपन्यांमध्ये इंटरव्ह्यू दिले होते. चारही ठिकाणी त्याची निवड झाली. कोणती कंपनी निवडायची, हा प्रश्न होता. डीएलटीएक्सपेक्षा इतर तीन कंपन्यांची पॅकेज जास्त होती. मात्र डीएलटीएक्सच्या ऑफिसमध्ये दिसलेला भारतीय झेंडा आणि गणपती बाप्पाची मूर्ती पाहून मयूर भारावला. पैशांपेक्षा चांगले वातावरण, आपुलकी आणि कुटुंबासारखी संस्कृती अधिक महत्त्वाची असते. त्यातून त्याने या कंपनीची निवड केली. समितीने दिलेली दिशा, शिस्त आणि कार्यकारी विश्वस्थ तुषार रंजनकर यांचे मार्गदर्शना यांचा आपल्यावर मोठा प्रभाव असल्याचे त्याने सांगितले.

## जल्लोष क्रीडा महोत्सवाचे आयोजन

विद्यार्थी विकास केंद्राच्या क्रीडा गटाच्या वतीने २१ डिसेंबरपासून 'जल्लोष क्रीडा महोत्सव २०२५–२६' सुरू आहे. यामध्ये क्रिकेट, खोखो, कबड्डी, व्हॉलीबॉल या मैदानी खेळांसह बॅडमिंटन, बुद्धिबळ, कॅरम, टेबल टेनिस, टेनिकॉईट, शॉटपुट अशा विविध क्रीडा प्रकारांचा समावेश आहे. या क्रीडा महोत्सवात पाचशेपेक्षा अधिक खेळाडूंनी सहभाग घेतला आहे. महोत्सवासाठी डॉ. ज्योती गोगटे आणि श्री. गणेश कळसकर यांनी टी-शर्ट स्वरुपात प्रायोजकत्व दिले आहे.

आयोजनामध्ये समितीचे माजी विद्यार्थी निसार चौगुले यांनी विशेष योगदान दिले. स्पर्धांचे नियोजन वसतिगृहांचे क्रीडा प्रमुख सानिका येलमाटे, भाग्यश्री वाघ, साक्षी हुडगे, कार्तिका, चिन्मय भावसार, शिवम विधाते, ओंकार पवार, ओंकार शिंदे, अनुष्का राऊत यांच्यासह पर्यवेक्षक सचिन खांडेकर करीत आहेत. या महोत्सवाचे समन्वयक प्रणय पाले आहेत. या 'क्रीडा महोत्सवाचा समारोप ३ जानेवारीला होणार आहे.

## जुन्या मराठी गीतांची मैफल

▶पान १ वरून

यांनी गप्पांमधून जागविलेल्या मराठीतील दिग्गज संगीतकार, गीतकार यांच्या आठवणी, गाण्यांविषयीचे किस्से आणि त्यांना दृकश्राव्य माध्यमातून अनेक कलाकारांनी दिलेली साथ यामुळे कार्यक्रम उत्तरोत्तर रंगत गेला. गणेश कला क्रीडा केंद्रात सुमारे अडीच हजार हून अधिक रसिकांच्या उपस्थितीत झालेल्या या लाईव्ह इन कॉन्सर्टला टाळ्यांच्या कडकडाटाबरोबरच मोबाईलच्या फ्लॅशलाईटनेही दाद मिळाली.

सुरुवातीला पाच वर्षांची चिमुकली सावी वाणी हिने गणेशवंदना सादर केली. कार्यक्रमात शमिका भिडे, मुक्ता जोशी, राजेश्वरी पवार, आशुतोष मुंगळे, जयदीप वैद्य, भूषण मराठे यांनी गीते गायली. या कार्यक्रमाला समितीचे अध्यक्ष प्रतापराव पवार, कार्यक्रमाचे प्रायोजक क्रिसेंट म्युच्युअल फंड डिस्ट्रिब्युर्स कंपनी प्रायव्हेट लिमिटेडचे संचालक भूषण वाणी, समितीचे कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर यांच्यासह सर्व विश्वस्त, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि कर्मचारी उपस्थित होते.

### गीतांची मेजवानी आणि रुचकर भोजनही

समितीचे कार्यकर्ते राजेंद्र ततार यांच्या माध्यमातून समितीशी जोडले गेलेले भूषण वाणी यांच्या क्रिसेंट म्युच्युअल फंड डिस्ट्रिब्युटर्स प्रायव्हेट लिमिटेडने हा कार्यक्रम प्रायोजित केला होता. ही कंपनी गुंतवणूकदारांसाठी काम करते. जुन्या, सुमधूर गीतांच्या मेजवानीबरोबरच रसिकांना भोजनाचा आस्वादही प्रायोजकांनी दिला.